# पक्षांतरबंदी कायदा व सद्यस्थिती: एक अवलोकन

**प्रा. डॉ. चव्हाण ए. ए.**
मत्स्योदरी कला महाविद्यालय,
तिर्थपुरी, जि. जालना

**प्रस्तावना:**

इ.स. १९८५ साली ५२व्या घटनादुरुस्तीअन्वये पक्षांतरबंदी कायदा संमत करण्यात आला. यामध्ये लोकसभा व राज्य विधीमंडळातील सदस्यांना पक्षांतराच्या आधारे अपात्र ठरविण्याची तरतूद करण्यात आला. यासंदर्भात विस्तृत असे १०वे परिशिष्ट समाविष्ट करण्यात आले आहे. पक्षांतरबंदी कायद्याचा प्रमुख हेतू पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या सदस्याने पक्षातच राहिले पाहिजे आणि पक्षाच्या आदेशाचे पालन केले पाहिजे हा होता. निवडणूकीच्या माध्यमातून निवडून आल्यानंतर राजकीय सोयीसाठी कुणीही कोणत्याही पक्षात जाऊ नये यासाठी पक्षांतर बंदी कायदा आहे. निवडून आल्यानंतर पक्ष सोडल्यास संबंधित लोकप्रतिनिधी आपोआप अपात्र ठरतो. यासह अनेक महत्त्वाच्या तरतुदी या कायद्यात आहेत. वेळोवेळी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयांमुळे हा कायदा आणखी मजबूत बनतो असे असले तरी पक्ष बदलण्यासाठी अनेकजण या कायद्यात पळवाटाही शोधतात. भारताच्या राजकारणात पक्षांतर ही प्रथा घट्ट मूळ धरून बसलेली आहे. त्यातल्या त्यात निवडणुकांच्या काळात तर याचे दर्शन वेळोवेळी पाहायला मिळते. विरोधी पक्षांतील प्रबळ नेत्यांना काहीही करुन आपल्या पक्षात खेचून आणणे हे जवळपास प्रत्येक पक्षाने मान्यच केलेले आहे.

**कायद्याची पार्श्वभूमी**

हरियाणातील आमदार गया लाल यांच्या अल्पावधीतच अनेक पक्ष बदलल्यानंतर 'आया राम गया राम' हे वाक्य प्रसिद्ध झालं होतं. राजीव गांधी यांच्या सरकारने १९८५ ला (५२ वी) घटना दुरुस्ती विधेयकामार्फत संविधानात दहाव्या अनुसूचीचा समावेश केला. १९६७ ला काँग्रेसने केंद्रात सत्ता मिळवली. पण सदस्यसंख्या ३६१ वरुन २८३ वर आली. याच काळात सात राज्यातली सत्ताही काँग्रेसने गमावली कारण त्यावेळी अनेक आमदारांनी पक्ष बदलला होता. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसचे तत्कालीन खासदार पी वेंकटसुब्बैय्या यांनी एका उच्चस्तरीय समितीची शिफारस केली. आमदार-खासदारांनी पक्ष बदल करण्यावर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करणं या समितीचं काम होतं.

या कायद्यान्वये एखाद्या सभागृहाच्या स्वतंत्र निवडून आलेल्या सदस्याने जर अशा निवडणुकीनंतर कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश घेतला तर तो गृहाचा सदस्य राहण्यास अपात्र ठरतो. तसेच सभागृहात पदग्रहण केल्यानंतर सहा महिन्यंच्या कालावधीनंतर जर नामनिर्देशित सदस्याने कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश घेतला तर तो त्या सभागृहाचा सदस्य राहण्यास अपात्र ठरतो. अध्यक्ष किंवा सभापती निर्णायक मत देतेवेळी कोणत्याही बाजूस मतदान केल्यास मत दिले तरी त्यांच्यावर पक्षांतर बंदी कायद्याच्या चौकटीत बसवून कार्यवाही करता येत नाही.

**भारतातील विविध पक्ष व पक्षांतर बंदी कायदा:**

भारतात १५ मार्च २०१९ च्या आकडेवारीनुसार एकूण २,३३४ राजकीय पक्ष असून, त्यापैकी ८ राष्ट्रीय पक्ष, २६ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर २,३०१ नोंदणीकृत पक्ष आहेत. यापैकी महाराष्ट्रात एकूण १४५ नोंदणीकृत पक्ष आणि २ राज्यस्तरीय पक्ष आहेत. पक्षांतरबंदी कायद्याचा प्रमुख हेतू पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या सदस्याने पक्षातच राहिले पाहिजे आणि पक्षाच्या आदेशाचे पालन केले पाहिजे हा होता. या कायद्याअन्वये एखाद्या सभागृहाच्या स्वतंत्र निवडून आलेल्या सदस्याने जर अशा निवडणुकीनंतर कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश घेतला तर तो गृहाचा सदस्य राहण्यास अपात्र ठरतो. तसेच सभागृहात पदग्रहण केल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीनंतर जर नामनिर्देशित सदस्याने कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश घेतला तर तो त्या सभागृहाचा सदस्य राहण्यास अपात्र ठरतो.

संविधानाच्या ९१ व्या दुरुस्तीनुसार लोकसभा किंवा विधानसभेत निवडून आलेल्या एकूण सदस्यसंख्येच्या दोन तृतीयांश सदस्यांनी स्वतंत्र गट स्थापन केला किंवा गट दुसऱ्या पक्षात विलीन केला, तर पक्षांतरबंदी कायद्याच्या कचाट्यात हे पक्षांतर येत नाही. राजीव गांधी पंतप्रधान असताना करण्यात आलेल्या ५२ व्या घटना दुरुस्तीनुसार एकतृतीयांश सदस्यांनी पक्षांतर केले तरी कायद्याच्या कचाट्यात सापडत नसे; पण घटनादुरुस्तीचा हा हेतू साध्य न झाल्यानेच २००३ मध्ये अटलबिहारी वाजपेयी सरकारने ९१ व्या घटना दुरुस्तीनुसार दोनतृतीयांश सदस्यांनी पक्षांतर करण्याची तरतूद केली. राजीनामा देऊन पुन्हा निवडून येणे हे सद्य परिस्थितीत आमदारांसाठी कठीण ठरु शकते.

**पक्षांतराची सद्यस्थिती:**

पक्षांतर बंदी कायदा महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू आहे. यामुळे स्वार्थी फुटीर कारवायांना काही प्रमाणात आळा बसतो. त्याचबरोबर हेही दिसते की कायदा निर्मितीस दोन दशके उलटल्यानंतरही पळवाटांचा फायदा घेत फुटीर नेते लोकशाहीची थट्टा आजही उडवत असल्याची अनेक

उदाहरणे आपल्या आसपास बघायला मिळतात. आपल्या देशात १९८५ पासून जरी पक्षांतर बंदी कायदा अस्तित्वात असला तरी कायद्याच्या कक्षेत राहूनही या कायद्याचे उल्लंघन कसे करता येते व राजकीय फायदे कसे पदरात पाडून घेता येतात, हे भारतीय मतदारांनी अनेक वेळा बघितले आहे.

राजकारण आणि नैतिकता यांच्यातील संबंध हा जगभर सतत चर्चेत असलेला विषय आहे. महात्मा गांधीच्या मते, तर नैतिकता नसलेले राजकारण म्हणजे चोरांचा बाजार होय. आपल्या देशातही स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा सुरुवातीच्या काळात राजकारणात किमान नैतिकता होती. आजच्या राजकीय नेत्यांना राजकारणाचा खरा अर्थ समजून घेण्याची आवश्यकता आहे. राजकारणाचा अर्थ सत्ताकारण असाच गृहीत धरण्यात येतो आणि लोक सत्तेच्या मागे धावतात. सत्ता बदलली की अनेकजण पक्ष बदलतात हे आता सर्वमान्य सुत्र झाले आहे.

**निष्कर्ष:**

संसदीय वादविवाद आणि चर्चा ह्या सुदृढ लोकशाहीचे दर्शन घडवतात. सभागृहातील चर्चांमध्ये अनास्था आणि गैरसोय, वैयक्तिक सदस्यत्वाचे महत्त्व झाकोळून टाकत आहेत. अनियंत्रित आणि अनैतिक पक्षांतराला विरोध असलाच पाहिजे पण सदस्यांच्या वैयक्तिक अभिव्यक्ती स्वातंत्र्याचासुद्धा मान राखला पाहिजे. उगवतीला नमस्कार करणाऱ्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची आपल्या देशात कधीच कमतरता नव्हती. प्रश्न आहे तो पक्षीय विचारांच्यापुढे जाऊन लोकशाहीचा विचार करण्याचा. पक्षीय राजकारण सोडून देशहितासाठी पक्षांतराबाबत कठोर निर्णय घेणे अपरिहार्य बनले आहे.

**संदर्भ:**

Bhambhari, Chander Prakash. Democracy in India. National Book Trust, New Delhi, 2008.

Ghai, K.K. Indian Government and Politics. Ludhiana: Kalyani Publishers, 2002

Jones, W. H. Morris. Politics Mainly Indian. Bombay: Orient Longman, 1978.

Yadav, Yogendra and Kumar, Sanjay. “Interpreting the Mandate,” Frontline 16, issue 22, October 23-November 5, 1999.

जोशी सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद,

क्षीरसागर, आर. के. : आजच्या समस्या आणि भारतीय संविधान, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद